**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक ३० मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार संपला, ४ जून रोजी होणार मतमोजणी.**
2. **नागपूरच्या कळमना मार्केट इथं ४ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीच्या दृष्टीने वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्याचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांचे निर्देश.**
3. **पशुसंवर्धन विभागाद्वारे नॅशनल डिजिटल लाईव्हस्टॉक मिशन "भारत पशुधन" प्रणालीमध्ये नोंदणी प्रक्रिया सुरू - सर्व पशुधनाचे ईयर टॅगिंग अनिवार्य.**
4. **नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल - जूनच्या पहिल्या तारखेपासून विदर्भात राहणार वादळी पर्जन्यमान.**

*****

## प्रचार संपला/ मतमोजणी

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार आज संध्याकाळी संपला. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघात येत्या शनिवारी मतदान होणार आहे. त्यात बिहारमधल्या ८, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडच्या ३, ओदिशातल्या ६, पंजाबमधल्या सर्व १३ उत्तरप्रदेशातल्या १३, पश्चिम बंगालमधल्या ९, आणि चंडीगढमधल्या एका जागेचा समावेश आहे. या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार नशीब आजमावत आहेत. ओदिशा विधानसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदानही येत्या शनिवारी होणार असून त्या ४२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होईल. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजी होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २ जून रोजी होणार आहे.

## पदवीधर मतदारसंघ

भारत निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता निवडणूक होत असून आगामी २६ जून रोजी मतदान होणार आहे. मंत्रालयात आयोजित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबतच्या बैठकीत मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी त्यांनी सांगितलं की, विलास पोतनीस, निरंजन डावखरे, किशोर दराडे आणि कपिल पाटील हे येत्या ७

जुलै रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगाने २ शिक्षक मतदारसंघ आणि २ पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी उद्या अधिसूचना जारी करण्यात येणार आहे.

## मतमोजणी

नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी कळमना मार्केट इथं येत्या ४ जून रोजी सकाळी सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी काल कळमना परिसरातील पार्किंग, वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश दिले. मतमोजणीसाठी आवश्यक ते सर्व प्रशिक्षण आणि जबाबदाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यांवर निश्चित करुन दिल्या आहेत. आपल्या कर्तव्यात कुठेही कसूर होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घेण्याचे आदेश डॉ.इटनकर यांनी दिले. मतमोजणी पूर्व तयारी आणि काटेकोर नियोजनासाठी आज त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेचे नियोजन, सनियंत्रण आणि अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येकाने आपापली जबाबदारी समन्वयाने पार पाडावी. निवडणूक कामात कुठेही दिरंगाई होता कामा नये, त्याचप्रमाणे टेबलावरील प्रत्यक्ष मतमोजणी, टपाली मतपत्रिका व इतर कार्यवाही विहितपणे पार पडेल याची दक्षता घेण्याच्या सूचना डॉ.इटनकर यांनी यावेळी दिल्या.

## महावितरण

महावितरणने एकापेक्षा जास्त वीज जोडण्या असलेल्या ग्राहकांसाठी वीज जोडण्यांची बिले एकाच ठिकाणाहून ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. तसंच वेळेत बिल भरल्यास एक टक्का सूटही देण्यात येणार आहे. एकापेक्षा जास्त वीज जोडण्या आणि त्यांच्या बिल भरण्याच्या वेगवेगळ्या तारखा अशी समस्या असलेल्या सरकारी तसंच खाजगी कंपन्याना या सुविधेचा फायदा होणार आहे. किमान दहा वीज कनेक्शन असलेला कोणताही सरकारी विभाग किंवा खासगी कंपनीला या सुविधेसाठी महावितरणच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करता येईल किंवा जवळच्या महावितरण कार्यालयातून याबाबत मार्गदर्शन घेता येईल,असं महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी सांगितलं आहे.

## विजय वडेट्टीवार

छत्रपती संभाजीनगर येथील पिंपळखुंटा गावातील ५२ वर्षीय शेतकऱ्याने शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. हे अतिशय गंभीर असून महायुती सरकारचे हे अपयश आहे अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. सरकारने या कुटुंबाला न्याय दिला पाहिजे, आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. त्याचबरोबर दाभाडे यांच्या कुटुंबियांची भेट

घेऊन या कुटुंबीयांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे असल्याचं आश्वासन देखील त्यांनी दिलं.

## ईयर टॅगींग

सर्व पशुधनाची सर्वंकष माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी यासाठी पशुसंवर्धन विभागाद्वारे नॅशनल डिजीटल लाईव्हस्टॉक मिशन “भारत पशुधन” प्रणालीमध्ये नोंदणी प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. पशुधनामधील सांसर्गीक रोगांना प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियमाद्वारे सर्व पशुधनांचे ईयर टॅगींग करुन या प्रणालीवर नोंद करणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती प्रादेशिक पशुसंर्वधन सहआयुक्त डॉ.सतीश राजु यांनी दिली.नागपूर विभागातील सर्व ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका क्षेत्रातील पशुधनास ईयर टॅगींग अनिवार्य राहणार आहे. दिनांक 1 जुन 2024 नंतर ईयर टॅगींग असल्याशिवाय पशुवैद्यकीय संस्था, दवाखाने यांच्यामार्फत पशुवैद्यकीय सेवा देण्यात येणार नाही. तसेच कत्तलखान्यांमध्ये टॅग असल्याशिवाय म्हैस वर्गीय जनावरांची कत्तल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही अशी माहिती डॉ. राजु यांनी दिली. प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गीक रोगास प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम 2009 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पशु व पशुजन्य उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टिने सर्व पशुधनाचे ईयर टॅगींग करुन भारत पशुधन प्रणालीवर नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ‘1962 भारत पशुधन’ या ॲपवर नोंदणी संदर्भातील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पशुधनाचा मालकी हक्क व हस्तांतरणाबाबतच्या नोंदी संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत पशुपालकांची राहणार आहे.

## नकली नोटा जप्त

एका लाखाच्या बदल्यात चार पटीनं रक्कम मिळेल असं आमिष दाखवीत लुटणाऱ्या टोळीला नागपुरातील सीताबर्डी पोलीसांनी सापळा रचून अटक केली. या संदर्भात 4 आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून हुबेहूब दिसणाऱ्या चिल्ड्रेन बँकच्या ५०० रुपयांच्या नोटांचे ४४ बंडल पोलीसांनी जप्त केले आहे. एका समाज माध्यमावर ओळख झाल्यानंतर फिर्यादीला फसवण्याचा आरोपी प्रयत्न करत होता.

## नैर्ऋत्य मोसमी पाऊस

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून दोन दिवस आधी दाखल झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तामिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह, ईशान्य

भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं.

## हवामान

विदर्भात उन्हाचा तडाखा अद्यापही कायम आहे. आज नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. याशिवाय भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात यलो अलर्ट जारी करण्यात आला होता. उद्या देखील नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर इथं उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मात्र एक, दोन आणि तीन जून रोजी पूर्व विदर्भात नागपूरसह बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं. यावेळी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. नागपूर महानगरपालिकेद्वारे उष्माघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. शहरातील मेडिकल, मेयो, डागा तसेच मनपाच्या इंदिरा गांधी रुग्णालय, आयसोलेशल हॉस्पिटल आणि पाचपावली रुग्णालय यासह ईएसआयएस रुग्णालय, आयुर्वेदिक हॉस्पिटल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय येथे ‘कोल्ड वार्ड’ तयार करण्यात आले आहेत. १०८ क्रमांकाच्या ११ आणि मनपाच्या ७ रुग्णवाहिका २४ तास तत्पर असल्याची माहिती डॉ.नवखरे यांनी दिली आहे. आमच्या प्रतिनिधीने दिलेल्या माहिती नुसार भंडारा जिल्ह्यात उष्मघाताच्या पहिल्या बळीची नोंद झाली आहे. मृत व्यक्तीला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

******